







खंडित लोककलेचे कलात्मक पुनरुज्जीवन

राजीव जोशी
mtedit@timesgroup.com

चौथी भिंत

महाराष्ट्रात लोककलांची प्राचीन परंपरा आहे. काळाच्या वेगात अनेक जुन्या गोष्टी मोडीत काढल्या जात आहेत. अशा वातावरणात वेगळे करू पाहणारी मोजकी कलासक्त मंडळी आहेत. त्यांनी आपल्या गावभागातील लोप पावलेल्या 'कलगीतुरा'सारख्या प्रथा-परंपरेचा अभ्यास करून त्यावर एक नाटक तयार केले आणि ते एनसीपीएसारख्या सांस्कृतिक केंद्राने व्यावसायिक स्तरावर निर्मिती करून 'कलगीतुरा' नावाचे नाटक चोखंदळ प्रेक्षकांसाठी आणलेले आहे. नाशिक हे शहर रंगमंचाच्या संदर्भात नवे काही करू पाहणाऱ्या मंडळींचे ठिकाण म्हणून ओळखले जाते आहे. (पुर्वीही पुत्र, तो एक स्वप्नपक्षी, सारे प्रवासी तिमिराचे, चमक, काळ्या मिच्च काळ्या रंगामध्ये बुडवून, वेटिंग फॉर गोदो अशी अनवट नाटके झालेली आहेत) अलीकडे 'संगीत देवबाभळी', 'देवमाणूस' याप्रमाणेच कवी-नाटककार दत्ता पाटील (गढीवरच्या पोरी, हंडाभर चांदण्या, दगड आणि माती व तो राजहंस एक) आणि दिग्दर्शक सचिन शिंदे ही एकत्र काम करणारी जोडी नवे विषय-आशय मांडून गाव-खेड्यातील जग दाखवत असते. त्यांचा हा लक्षवेधक 'कलगीतुरा'.

पूर्वी गावामध्ये कोणाचे निधन झाल्यावर अंत्यविधी काही लगेच व्हायचे नाहीत. कारण संपर्क व दळणवळण व्यवस्था आजच्या इतकी सशक्त नसल्याने दूर-दूरचे आप्तस्वकीय खूप लांबून प्रवास करून यायचे. त्यांना मृत व्यक्तीच्या कुटुंबाच्या गावी पोहोचण्यासाठी बराच वेळ लागायचा. तोवर त्या दुःखी कुटुंबाने काय करायचे? त्यातून जन्माला आली ही परंपरा. रात्रभर कलगीतुऱ्याची कवने गात गावकरी त्यांच्या सोबत राहायचे. त्यांचे दुःख हलके करत, परंपरा राखत माणसे माणसांना साथ देत असत. ही परंपरा नव्याने मांडताना लेखकाने जुन्या कवनांचा, हस्तलिखितांचा शोध घेतला. त्यामागच्या हेतूंचा पाठपुरावा केला आणि त्यातून उभे राहिले एक आजचे नाटक, जे जुन्या परंपरेकडे नव्या दृष्टिकोनातून पाहते. पहिल्याच प्रवेशात आपण जातो ते १९८०च्या दशकात तेथे एका गावात दोन गट मंदिराच्या आवारात तालीम करताना दिसतात. कलगी आणि तुरेवाल्यांचे गायक आपापली कवने सादर करत असतात. दोघांच्या निर्मळ झगड्यातून एकमेकांना सवाल-जवाब, कूटप्रश्न विचारून त्यावर मार्मिक उत्तरे मिळवतात. कलगी श्रेष्ठ की तुरा? हा न संपणारा झगडा चालू राहतो. दोन्हीकडे परंपरागत पद्धतीने एका पिढीकडून पुढील पिढीकडे चालत आलेला किमान सात पिढ्यांचा कवन-साठा असे. एक शहरी संशोधक प्रोफेसर लेडी गावात लोककलेच्या अभ्यासासाठी येते आणि गावातील तरुणांना जुन्या लोककलेचा जिद्दीने शोध घ्यावासा वाटू लागतो. एकेकाळी कलगीतुरा केलेले मोजके कलावंत हयात आहेत. पण ते वयोवृद्ध आहेत. मात्र त्यांना कवने आठवताहेत, तरुण पिढीला देण्याची त्यांची तळमळ दिसून येते. लेखक दत्ता पाटील ह्यांचे मातीशी असलेले इमान शब्दाशब्दातून दिसते.

काळाच्या रेट्याने होणारे बदल हे सूक्ष्मतेने टिपले जातात. 'राष्ट्रशेवे'करीता आलिशान, महागडी गाडी घेणारे पुढारी आढळतात. १९९१ नंतरचे देशातील बदलते वारे-वातावरण अचूकपणे येते. कलगीतुरा ही परंपरा खंडित झाली त्याचे गांभीर्य एका वाक्यातून सूचित होते-'मढ गेले पण गाड हितेच रुतले आपले.' ही खंत जुन्या पिढीला टोचते, अन तरुण पिढी जुन्या पोथ्यांचा, हयात कलावंतांचा मागोवा घेत गावोगाव फिरते. (हा शोध अजून थोडा अडचणींचा-कष्टप्रद हवा होता.) गावाला, घरातल्यांना कळू न देता तालमी करतात आणि अचानक खुशखबर जाहीर होते. शिमग्यानिमित्त कार्यक्रम-कलगीतुरा ! वीस वर्षांनंतर पुन्हा सुरू होणार आपल्या गावची परंपरा! जगण्याच्या धबडग्यात, गावांचे शहरीकरण होण्याच्या नादात (आभासी जगण्यात) विसर पडलेल्या कलेची जणू पुनःस्थापना केली जाते. हा संदेशच सकारात्मक आहे.' 'जुने फेकून द्या, नवे कवटाळा!' अशा सार्वत्रिक वातावरणात आपली लोककला, संस्कृती ही मायेसारखी आधार देते. असे हे नाटक रंगमंचावरून सादर करताना दिग्दर्शक सचिन शिंदे ह्यांनी तितक्याच सायेपणाने मांडणी केलेली आहे. सूचक नेपथ्य, अभिनय व संगीतावर जास्त भर देणे हे स्वाभाविकच आहे. प्रसंगांची मांडणी उत्कंठावर्धक आहे. गोष्ट व संशोधन एकजिनसी असल्याने लेखक-दिग्दर्शकाचा सृजनशील समन्वय जाणवतो.

राजकीय संदर्भ, मनुष्यस्वभावातील विसंगती, ग्रामीण भागातील भेडसावणारे प्रश्न हे सर्व नेमकेपणाने आल्याने प्रयोग भिडतो. रखमाबाईच्या रूपाने होणारा विरोध (मढ नाही, दुःख राखतो), ही टिपणी व अन्य तत्कालीन संदर्भ योग्य प्रकारे अभिव्यक्त होतात. परंपरेच्या गुणदोषांची चिकित्साही होते. तरुण सर्जेरावचे 'पतझड सावन-मोसम चार' हे आधुनिक फिल्मी गीत तरुणाईची वृत्ती दर्शवते. शाहीर सखारामनाना –हेमंत महाजन हे अभिनय करताहेत असे वाटत नाही. अर्थात तीच तीव्रता विक्रम नन्नावरे(शाहीर सीतारामतात्या), निलेश सूर्यवंशी (सर्जेराव) इत्यादी कलाकारांनी दर्शवली आहे. काहीजण नवीन आहेत असे सांगितले गेले, तरी त्यांच्या कामात नवखेपणा जाणवत नाही. संगीत-कवने हा आत्मा असल्याने ती बाजू पक्की करण्याचे काम संगीतकार ऋषिकेश शेलार ह्यांनी मनापासून केले आहे. (लाइव्ह गायन व लोक- संगीत) रोहित सरोदे ह्यांचे पार्श्वसंगीत प्रसंगांना उठाव देते. नेपथ्य करताना चेतन बर्वे ह्यांनी मोजक्या साधनांनी आवश्यक अवकाश दिला आहे. (एक चौथरा, एक ट्रंक व एक खांब) रंगभूषा(ललित कुलकर्णी), वेशभूषा (कविता देसाई) ह्यांनी व्यक्तिरेखांना रंग-रूप दिले. प्रणव सपकाळे ह्यांनी अंधार-उजेडाद्वारे नाट्य गडद केले आहे. आजवर पोहा चालला महादेवा, लोककथा-७८, आख्यान तुकारामभाऊ यासारखे नाट्यप्रयोग हौशी-प्रायोगिक रंगभूमीवर झालेले आहेत. समाजभान आणि अस्तंगत होत चाललेल्या कलांचा हुंकार-वेदना मांडणारे हे व्यावसायिक नाटक वास्तवदर्शी आहे. मराठी नाटक व लोककलांसाठी अशा राष्ट्रीय स्तरावरील सांस्कृतिक केंद्राचा नव्याने होत असलेला थेट सहभाग हा एकूणच कलाविश्वाला प्रोत्साहित करणारा ठरेल.

मराठी नाटक : कलगीतुरा

लेखक : दत्ता पाटील
दिग्दर्शक : सचिन शिंदे
कलाकार : हेमंत महाजन, विक्रम नन्नावरे, निलेश सूर्यवंशी, राम वाणी, अरुण इंगळे, ऋषिकेश शेलार, राजेंद्र उगले, कृष्णा शिरसाठ, प्रवीण जाधव, शुभम लांडगे, किरण रायबच्चे, वैभवी चव्हाण, समृद्धी गांगुर्डे ,कविता देसाई आणि ऋषिकेश पाटील
संगीत : ऋषिकेश शेलार
सेट डिझाइन : चेतन बर्वे

'इंडिया' टीकेवरून मोदी लक्ष्य

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

ठाकरे गट, संभाजी ब्रिगेड मेळाव्यात उद्धव यांची टीका

'इंडिया, भारत, भारतमाता ही देशाची नावे आहेत. मला मोदी यांना प्रश्न विचारायचा आहे की, तुम्ही परदेशात जाता, बायडेन यांना मिठी मारता, त्यांच्याशी हस्तांदोलन करता. बाजूला उभे राहता, आम्हाला अभिमान वाटतो की, आमच्या देशाचे पंतप्रधान आहात. पण जेव्हा तुमची ओळख ही भारताचे पंतप्रधान म्हणून केली जाते, तेव्हा तुम्ही देशाचे पंतप्रधान म्हणून जाता की, इंडियन मुजाहिदीनचे प्रधानसेवक म्हणून,' अशा शब्दांत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीकास्त्र सोडले.

मुंबईतील रंगशारदा सभागृहात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष आणि संभाजी ब्रिगेडचा संयुक्त मेळावा पार पडला. या मेळाव्यात उद्धव ठाकरे बोलत होते. आगामी लोकसभा निवडणूक २०२४च्या पार्श्वभूमीवर नरेंद्र मोदी सरकारला सत्तेतून दूर ठेवण्यासाठी विरोधक एकवटले आहेत. विरोधकांच्या आघाडीची बैठक पार पडली. या आघाडीचे 'इंडिया', असे नामकरण करण्यात आले. त्यावर विरोधकांची ही आघाडी 'इंडिया' नाही, तर घमंडिया आहे, अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही दिवसांपूर्वी केली होती. या टीकेला उद्धव ठाकरे यांनी प्रत्युत्तर दिले. 'भाजपमध्ये राम राहिला नाही, आहेत ते सर्व आयाराम आहेत. मात्र आमच्या हृदयातला राम तुम्ही काढू शकत नाही. तुमचा आयारामांचा पक्ष झाला आहे. राम मंदिर बांधा, पण तुम्ही आयारामांचे मंदिर बांधले आहे, त्याचे काय,' असा प्रश्नही उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला.

रक्षाबंधन मुस्लिम महिलांकडून करून घ्या, अशा सूचना एनडीएतील खासदारांना मोदी यांनी दिल्या आहेत. पण, मणिपूरमध्ये ज्या महिलांची धिंड काढण्यात आली, त्यांच्याकडून राखी बांधून घ्या, असे उद्धव म्हणाले. 'मुस्लिम महिलांकडून राखी बांधून घ्यायची असेल, तर बिल्किस बानोकडून बांधून घ्या. तिच्या गुन्हेगारांना गुजरात सरकारने सोडले. राज्यातील भगवी ताकद फोडण्याचे काम औरंगजेबाच्या वृत्तीने केले आहे. औरंगजेब तुमच्यामध्ये दडलेला आहे. आमच्यामध्ये नाही. औरंगजेबाच्या घराणेशाहीचा इतिहास असेल, तर हा भाजपच्या घराणेशाहीचा इतिहास आहे,' अशी टीका त्यांनी केली.

प्रसिद्ध लोकगायक गदर यांचे निधन

वृत्तसंस्था, तेलंगण

हैदराबाद येथे घेतला अखेरचा श्वास; आज अंत्यसंस्कार

एक काळ माओवादी म्हणूनही गाजविलेले तेलंगणचे प्रसिद्ध लोकगायक गदर यांचे रविवारी निधन झाले. ते ७७ वर्षांचे होते. विद्रोही गीतांसाठी ते अतिशय लोकप्रिय होते. तेलंगण राज्यनिर्मितीच्या मागणीचा ते आवाज होते. माओवादी होते. नंतरच्या काळात लोकशाहीवर विश्वास करीत ते मुख्य प्रवाहात सहभागी झाले. त्यांच्यावर आज, सोमवारी अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. तत्पूर्वी हैदराबादच्या ए. बी. स्टेडियममध्ये त्यांचे पार्थिव अंत्यसंस्कारासाठी ठेवले जाणार आहे.

गुम्मडी विठ्ठल राव हे गदर यांचे मूळ नाव. त्यांचा जन्म मेडक जिल्ह्यातील तूप्रान येथे सन १९४९मध्ये झाला. गदर माओवादी होते. माओवादी चळवळीत बंदुकीसोबत त्यांनी रचलेले गाणे आणि जननाट्य मंडलीच्या आकर्षणातून शेकडो तरुण चळवळीकडे आकर्षित झाले होते. बराच काळ ते भूमिगतही होते. मात्र माओवाद्यांच्या निवडणुकीला विरोध असलेल्या विचारांपासून दूर जात गदर यांनी नंतर स्वतःचा राजकीय पक्ष स्थापन केला. ते मुख्य प्रवाहात आले. त्यांच्या निधनावर विविध राजकीय पक्षांनी तसेच सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी शोक व्यक्त केला आहे.

'अजितदादा, तुम्ही आता योग्य ठिकाणी बसलात'

(पान एकवरून)

मी एक गोष्ट सांगू इच्छितो. दादा, तुम्ही खूप कालावधीनंतर योग्य ठिकाणी बसला आहात. हीच जागा योग्य होती. पण, आपण खूप उशीर केला.' अमित शहा यांच्या या वक्तव्यावर सभागृहात टाळ्यांचा कडकडाट आणि हशा पिकला.

'महाराष्ट्र अमित शहा यांची जन्मभूमी'

अमित शहांकडून सहकारात मोठे बदल झाले आहेत. त्यांचा जन्म मुंबईतला आहे. अमित शहा यांना महाराष्ट्र खूप चांगला कळतो. अजितदादा म्हणाले ते महाराष्ट्राचे जावई आहेत. हे खरे आहे, पण त्यांचा जन्म मुंबईतला आहे. त्यांची कर्मभूमी गुजरात आणि दिल्ली असली, तरी त्यांची जन्मभूमी ही महाराष्ट्र आहे. म्हणूनच ते महाराष्ट्राचा विचार अधिक करतात, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

सामूहिक बलात्कारातील आरोपींना पोलिसाचीच मदत?

(पान एकवरून)

पोलिसांनी कनिष्ठ न्यायालयात बी-समरी अहवाल अर्जाच्या माध्यमातून दाखल केला. तो त्या न्यायालयाने न स्वीकारल्याने पोलिसांनी अर्ज मागे घेतला. त्यानंतर चारही आरोपींनी गुन्हा रद्द होण्यासाठी उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला. एफआयआर रद्द होण्याकरिता पीडितेची शपथपत्रावर संमती बंधनकारक असते. त्याप्रमाणे पीडितेनेही तसे शपथपत्र दाखल केले. सरकारी वकील मानकुंवर देशमुख यांनी या प्रकरणाची पार्श्वभूमी सांगितली. यावेळी पोलिस निरीक्षक नामदेव बाघमारे हे सुनावणीला उपस्थित होते. मात्र, एफआयआर, पोलिसांचा तपास व तपास अधिकाऱ्याचे प्रतिज्ञापत्र यातील तपशील पाहिल्यानंतर खंडपीठाला धक्का बसला. 'कथित गुन्ह्याबद्दल सांगणारा कोणीही स्वतंत्र साक्षीदार नसल्याने मी बी-समरी अहवाल तयार केला आणि त्याला वरिष्ठ पोलिस निरीक्षकांनी २० सप्टेंबर, २०२२ रोजी मान्यता दिली', असे तपास अधिकाऱ्याने प्रतिज्ञापत्रात म्हटले. हे अचंबित करणारे असल्याचे खंडपीठाने नमूद केले. 'बलात्कार किंवा लैंगिक शोषणाचे गुन्हे हे चार भिंतीच्या आत होत असतात. अशा प्रकरणांत स्वतंत्र साक्षीदार असण्याची शक्यता नसते आणि बलात्काराच्या प्रकरणांत पीडितेची साक्ष महत्त्वाची असून, पुष्टीकारक पुरावा बंधनकारक नसतो, असे सर्वोच्च न्यायालयानेही कैक निवाड्यांत स्पष्ट केलेले आहे. तरीही या गंभीर प्रकरणात तपास अधिकाऱ्याने स्वतंत्र साक्षीदार नसल्याचे कारण दिले. आरोपींनी उच्च न्यायालयात अर्ज केल्यानंतर संमतीचे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यासाठीही पीडितेवर दबाव आणल्याचे स्पष्ट होत आहे. हे सर्व पाहून आम्हाला प्रचंड धक्का बसला आहे', असे खंडपीठाने आदेशात नमूद करून पुढील सुनावणी २५ ऑगस्टला ठेवली.

महिला आयोग, पोलिस महासंचालकांकडे प्रत

'उच्च न्यायालयाच्या न्यायिक रजिस्ट्रार यांनी या आदेशाची प्रत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षांकडे पाठवावी. तसेच राज्याच्या पोलिस महासंचालकांकडेही पाठवावी. जेणेकरून अशा प्रकरणांच्या बाबतीत योग्य ती कायदेशीर पावले उचलता येऊ शकतील', असेही खंडपीठाने आदेशात स्पष्ट केले.

संपकरी ठाम, प्रवाशांचे हाल

(पान एकवरून)

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची सेवा खंडित करणे अशा विविध मागण्यांसाठी भाडेतत्त्वावरील बसचा पुरवठा करणाऱ्या मातेश्वरी, डागा ग्रुप, हंसा, टाटा कंपनी, ओलेक्ट्रा स्विच मोबीलिटी या कंपन्यांतील कंत्राटी चालक व वाहकांनी गेल्या पाच दिवसांपासून बेमुदत संप सुरू केला आहे. संपकऱ्यांच्या मागण्यांबाबत कुठलाही तोडगा न निघाल्याने कंत्राटींनी संपावर ठाम असल्याचे स्पष्ट केले.

कंत्राटी कामगारांबरोबर बेस्टचा संबंध नाही, असे बेस्ट उपक्रमाकडून शनिवारी झालेल्या बैठकीत सांगण्यात आले ते चुकीचे आहे. आमच्या मागण्या रास्त असून कायद्याने त्याची पूर्तता करणे अपेक्षित आहे. अद्याप तरी राज्य सरकार व बेस्ट उपक्रमाकडून बैठकीसाठी बोलावण्यात आले नाही, असे संघर्ष कामगार कर्मचारी युनियनचे अध्यक्ष शशांक राव यांनी सांगितले.

दरम्यान, आज, सोमवारी बेस्ट भवनात बस कंपन्या, कंत्राटी कामगारांचे प्रतिनिधी व बेस्ट उपक्रम यांच्यात बैठक होण्याची शक्यता असून दुपारपर्यंत काही तोडगा निघेल, असे सांगण्यात येते आहे.

मालवणी आगाराबाहेर पोलिस बंदोबस्त

कंत्राटी कामगारांच्या संपाच्या पार्श्वभूमीवर उपक्रमाने भाडेतत्त्वावरील बस प्रवाशांच्या सेवेत रस्त्यावर आणल्या आहेत. उपक्रमातील कायमस्वरूपी चालक व वाहक भाडेतत्त्वावरील बसेस चालवत असल्याने कंत्राटी कामगार त्यांना रोखून धमकावत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. मालवणी येथे झालेल्या प्रकारानंतर बेस्टकडून पोलिस ठाण्यात रीतसर लेखी तक्रार करण्यात आली. मालवणी पोलिस ठाण्यातर्फे मालवणी आगाराच्या प्रवेशद्वाराजवळ दोन पोलिस गाड्यांचा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. या घटनेनंतर मालवणी आगारातील बस गाड्या प्रवर्तित करतेवेळी कोणताही अडथळा निर्माण झालेला नाही, असे बेस्ट उपक्रमाकडून सांगण्यात आले.

बेस्टचा ताफा

- बेस्टच्या मालकीच्या बस - १,३९०
- भाडेतत्त्वावरील बस - १,६७१
- एकूण - ३,०६१

एसटीच्या १५० गाड्या सेवेत

कंत्राटी कामगारांच्या संपामुळे प्रवाशांची गैरसोय होऊ नये यासाठी एसटी महामंडळाकडून १५० गाड्या उपलब्ध झाल्या आहेत. शुक्रवार संध्याकाळपासून त्या प्रवासी सेवेत चालवण्यात आल्याचे बेस्ट उपक्रमाकडून सांगण्यात आले.

शालेय विद्यार्थ्यांचेही हाल

शाळेच्या विद्यार्थ्यांची ने-आण करण्यासाठीही बेस्टच्या बस दिल्या जातात. मात्र, कंत्राटी चालकांचा संप सुरू झाल्याने या बस अन्य मार्गांवर वळवण्यात आल्या आहेत. त्यामुळे पालकांना कामाला दांडी मारून मुलांना शाळेत सोडावे लागत आहे.

ज्ञानवापीत रविवारीही सर्वेक्षण

वृत्तसंस्था, वाराणसी

पुरातत्त्व विभागातर्फे ज्ञानवापी मशिदीचे सर्वेक्षण रविवारी, सलग तिसऱ्या दिवशीही सुरू होते. दरम्यान, मशिदीत हिंदू धर्मीयांची चिन्हे आढळल्याच्या अफवा उठविण्यात येत असल्याचा आरोप करून मुस्लिम पक्षाने यावर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे.

सरकारी वकील राजेश मिश्रा या सर्वेक्षणास उपस्थित होते. सकाळी आठ वाजता सुरू झालेले सर्वेक्षण सायंकाळी पाचपर्यंत सुरू होते. सर्वेक्षणावर हिंदू पक्षकार समाधानी असल्याचे वकील सुधीर त्रिपाठी यांनी सांगितले. दरम्यान, रविवारी झालेल्या सर्वेक्षणात मुस्लिम पक्षकार सहभागी झाले होते, अशी माहिती अंजुमन इंतेजामिया समितीचे सहसचिव सैद महंमद यासिन यांनी दिली. शुक्रवारी झालेल्या सर्वेक्षणात मुस्लिम पक्षकार सहभागी नव्हते. 'सर्वेक्षणात मशिदीच्या तळघरात हिंदू देवतांच्या मूर्ती, त्रिशूळ, कलश आढळल्याच्या अफवा माध्यमांचा एक गट उठवित असल्याचा आरोप यासिन यांनी केला. जर या अफवा थांबल्या नाहीत, तर मुस्लिम पक्षकार यावर बहिष्कार टाकतील,' असेही ते म्हणाले.

'खुल्या' कोशाचे बे'बंद' अस्तित्व

मटा GOLD
ऐकण्यासाठी QR Code स्कॅन करा.

'विकिपीडिया'वरची माहिती, तिची सत्यासत्यता, पडताळणी हा विषय नेहमीच चर्चिला जात असतो. 'विकिपीडिया'चे सहसंस्थापक जिमी वेल्स यांचा आज जन्मदिवस. या निमित्ताने, विकिपीडिया या खुल्या कोशाचा, मुक्त आणि खुल्या इंटरनेटचा, इंटरनेटवरील आपल्या बेबंद अभिव्यक्तीचा हा आढावा.

गोकुळ

टेंडर नोटीस

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि. कोल्हापूर यांच्या वाशी शाखा (नवी मुंबई) येथील खालील कामासाठी वाहतूक ठेकेदार यांचेकडून सिलबंद टेंडर्स मागविण्यात येत आहे.

कामाचे नाव : दही, ताक व इतर अनुशंगीक साहित्य वाहतूकीसाठी

मार्गाचे नाव	वाहनाचा प्रकार	वाहतूक क्षमता	वाहन संख्या
वाशी शाखा, नवी मुंबई ते कामोठे	इंन्शुलेटेड वाहन	३.० मे. टन	१
वाशी शाखा, नवी मुंबई ते कामोठे	इंन्शुलेटेड वाहन	५.० मे. टन	१

सदर दही, ताक व इतर अनुशंगीक साहित्य वाहतूकी करीता आवश्यक असणारी वरील नमूद इंन्शुलेटेड बॉडी असणारी वाहने भाडेतत्वावर घेणे करीता, टेंडर फॉर्म कार्यालयीन कामकाजा दिवशी दि. ०७.०८.२०२३ ते दि. १४.०८.२०२३ (दुपारी २ पर्यंत) या कालावधीत रक्कम रु. १०००/- (रु. एक हजार फक्त) रोख भरून संघाचे वाशी शाखा (नवी मुंबईकडील) खालील पत्त्यावर मिळतील. सदरचे टेंडर संपुर्ण माहिती व अनामत रक्कमेच्या डी.डी. सह संघाचे वाशी शाखा (नवी मुंबईकडील) खालील पत्त्यावर दि. १४.०८.२०२३ (दुपारी २ पर्यंत) स्वीकारले जातील. सविस्तर टेंडर नोटीस व टेंडर फॉर्म (वाहतूक नियम व अटीसह) संघाचे वेबसाईट www.gokulmilk.coop वर फक्त माहितीसाठी उपलब्ध आहेत. सदरचे टेंडर स्वीकारणे अथवा नाकारणेचा अधिकार व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे.

कार्यकारी संचालक
चेअरमन
कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि., कोल्हापूर
४०/४ व ४०/५, मॅफको यार्ड, सेक्टर नं.१८, तुर्भे, नवी मुंबई- ४०० ७०३
फोन - (०२२) ४०२८५६५०, ४०२८५६०१ ते १०
Email : gokul.vashi@gmail.com Website : www.gokulmilk.coop

Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई ४०० ०२१
दूरध्वनी: +९१-२२-३५५५ ५००० • फॅक्स: +९१-२२-२२०४ २२६८ • ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

कंपनीच्या भागधारकांसाठी सूचना
सेहेचाळीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा (आयपीओ-पश्चात) आणि ई-मतदानासंबंधी माहिती

कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया यांनी जारी केलेल्या परिपत्रकांची पूर्तता करत असताना, **सोमवार, दिनांक २८ ऑगस्ट, २०२३ रोजी भाप्रवेळ दुपारी २:०० वाजता** व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ("**व्हीसी**")/इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमां ("**ओएव्हीएम**") द्वारे होणाऱ्या कंपनीच्या सेहेचाळीसाव्या (आयपीओ-पश्चात) वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना ("**एजीएम**"), आणि आर्थिक वर्ष २०२२-२३ चे स्वतंत्र व एकत्रित लेखापरीक्षित वित्तीय विवरण, त्याचप्रमाणे संचालक मंडळाचा अहवाल, लेखापरीक्षकांचा अहवाल व त्यासोबत जोडण्याची आवश्यकता असलेले इतर दस्तऐवज, कंपनीच्या सदस्यांना **६ ऑगस्ट, २०२३** रोजी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात आले आहेत. एजीएमची सूचना आणि वर नमूद करण्यात आलेले दस्तऐवज कंपनीच्या वेबसाईटवर **www.ril.com** येथे आणि स्टॉक एक्सचेंज म्हणजे बीएसई लिमिटेड ("**बीएसई**") आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया ("**एनएसई**") यांच्या वेबसाईटवर अनुक्रमे **www.bseindia.com** येथे आणि **www.nseindia.com** येथे व कंपनीचे रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंट, केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड ("**केफिनटेक**") यांच्या वेबसाईटवर **https://evoting.kfintech.com** येथे उपलब्ध आहेत.

एजीएमची सूचना प्रसारित करण्याच्या तारखेपासून एजीएमच्या सूचनेत नमूद करण्यात आलेले दस्तऐवज सदस्यांसाठी तपासणीसाठी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने उपलब्ध आहेत. सदर दस्तऐवज तपासण्याची इच्छा असलेल्या सदस्यांनी **rilagm@ril.com** येथे ई-मेल पाठवावे.

दूरस्थ ई-मतदान आणि एजीएमच्या दरम्यान ई-मतदान:

कंपनी आपल्या सदस्यांना एजीएममध्ये मंजूर करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या ठरावांवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने ("**ई-मतदान**") मतदान करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देत आहे. सदस्य येथे खाली नमूद करण्यात आलेल्या तारखांना दूरस्थ पद्धतीने मतदान करू शकतील ("**दूरस्थ ई-मतदान**"). कंपनीने ई-मतदान सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केफिनटेक यांच्या सेवा घेतल्या आहेत.

डिमटेरियलाईज्ड स्वरूपात, प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या आणि ज्यांनी त्यांचे ई-मेलचे पत्ते नोंदविलेले नाहीत अशा सदस्यांसाठी दूरस्थ मतदान पद्धतीने मतदान करण्यासह, मतदानाशी संबंधित माहिती आणि सूचना एजीएमच्या सूचनेत देण्यात आल्या आहेत. (अ) एजीएमची सूचना पाठविण्यात आल्यानंतर कंपनीची सदस्य बनलेल्या आणि कट-ऑफ तारखेला (येथे नमूद करण्यात आली आहे) समभाग धारण करणाऱ्या व्यक्ती, (ब) युजर आयडी आणि पासवर्ड विसरलेले सदस्य, यांनी कोणत्या पद्धतीने युजर आयडी आणि पासवर्ड मिळवावे/तयार करावे हे एजीएमच्या सूचनेत नमूद करण्यात आले आहे.

दूरस्थ ई-मतदान सुविधा खालील मतदान कालावधीत उपलब्ध असेल:

दूरस्थ ई-मतदान सुरू होण्याची वेळ	**बुधवार, दिनांक २३ ऑगस्ट, २०२३ रोजी भाप्रवेळ दुपारी ०१:०० वाजता**
दूरस्थ ई-मतदान संपण्याची वेळ	**रविवार, दिनांक २७ ऑगस्ट, २०२३ रोजी भाप्रवेळ सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत**

वरील तारीख व वेळेनंतर दूरस्थ ई-मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही आणि केफिनटेक द्वारा वरील कालावधी संपल्यानंतर दूरस्थ ई-मतदान मॉड्यूल बंद करण्यात येईल.

ज्यांनी दूरस्थ ई-मतदान पद्धतीने मतदान केलेले नाही असे एजीएमला उपस्थित असलेले सदस्य एजीएममध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान ("**इन्स्टा पोल**") करू शकतील.

कट-ऑफ तारखेला म्हणजे सोमवार, दिनांक २१ ऑगस्ट, २०२३ रोजी ज्यांचे नाव सदस्यांच्या रजिस्टरमध्ये नोंदविण्यात आले आहे अशी व्यक्तीच फक्त दूरस्थ ई-मतदान सुविधेचा लाभ घेण्यास किंवा इन्स्टा पोल द्वारा मतदान करण्यास पात्र असेल.

ई-मेलचा पत्ता नोंदण्याची/सुधारणा करण्याची पद्धती:

अ) ज्यांनी कंपनीकडे त्यांच्या ई-मेल पत्त्याची नोंदणी/सुधारणा केली नाही अशा प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या सदस्यांना, आवश्यक पूरक दस्तऐवजांसह योग्य प्रकारे भरलेले आणि स्वाक्षरी केलेले प्रपत्र आयएसआर-१ (जे कंपनीच्या वेबसाईटवर **www.ril.com** येथे उपलब्ध आहे) केफिनटेक यांना सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१-३२, गचीबावली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, हैदराबाद ५०० ०३२, येथे सादर करून त्यांच्या ई-मेल पत्त्याची नोंदणी/सुधारणा करण्याची विनंती करण्यात येत आहे.

ब) ज्यांनी त्यांच्या ई-मेल पत्त्याची नोंदणी/सुधारणा केली नाही अशा डिमटेरियलाईज्ड स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या सदस्यांना, त्यांचे डिमॅट खाते जेथे आहे अशा डिपॉझिटरी सहभागीकडे त्यांच्या ई-मेल पत्त्याची नोंदणी/सुधारणा करण्याची विनंती करण्यात येत आहे.

ई-मतदानासंबंधी काही शंका असल्यास, सदस्यांनी केफिनटेकची वेबसाईट **https://evoting.kfintech.com** येथे ई-मतदानासाठी उपलब्ध असलेल्या "डाउनलोड्स" भागात हायपरलिंक द्वारा उपलब्ध असलेला "हेल्प" आणि "एफएक्यू" भाग/ई-मतदान वापरण्याविषयी माहिती पुस्तिका पहावी.

ई-मतदानासंबंधी काही चौकशी/तक्रार असल्यास, सदस्यांनी खालील संपर्काच्या तपशीलाची नोंद घेण्याची विनंती करण्यात येत आहे:
श्री. व्ही. बालाकृष्णन, उपाध्यक्ष
केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड
सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१-३२, गचीबावली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट,
नानाक्रमगुडा, हैदराबाद ५०० ०३२
ई-मेल: **evoting.ril@kfintech.com**
टोल फ्री क्रमांक: १८०० ३०९ ४००१ (सर्व कामकाजाचे दिवशी सकाळी ९:०० (भाप्रवेळ) ते सायंकाळी ६:०० (भाप्रवेळ) पर्यंत)

व्हीसी/ओएव्हीएम द्वारा एजीएममध्ये सहभागी होणे:

सदस्य जिओमीट द्वारा https://jiomeet.jio.com/rilagm येथे व्हीसी/ओएव्हीएम द्वारा एजीएमला उपस्थित राहू शकतील. येथे वापरण्याची लॉग-इनची माहिती आणि एजीएमला उपस्थित राहण्याचे टप्पे यासंबंधी माहिती एजीएमच्या सूचनेत टिप क्र.१ मध्ये देण्यात आली आहे. ज्यांनी दूरस्थ ई-मतदान पद्धतीने मतदान केले आहे असे सदस्य एजीएमला उपस्थित राहू शकतील परंतु पुन्हा एजीएममध्ये त्यांचे मतदान करण्यास पात्र नसतील.

संचालक मंडळाच्या आदेशाने
स्वाक्षरी/-
सावित्री पारेख
कंपनी सेक्रेटरी आणि
कंप्लायन्स ऑफिसर

स्थळ : मुंबई
दिनांक : ६ ऑगस्ट, २०२३

www.ril.com

SHRI VILE PARLE KELAVANI MANDAL's
DWARKADAS J. SANGHVI
COLLEGE OF ENGINEERING
(Autonomous College Affiliated to the University of Mumbai)
NAAC Accredited with "A" Grade (CGPA: 3.18)
Plot No. U-15, Juhu Scheme, Bhaktivedanta Swami Marg, Vile Parle (West), Mumbai-400 056. **Tel:** +91 022 4233 5000 / 5001
Website: www.djsce.ac.in **Email:** info@djsce.ac.in
College Code: 01013199 / College Directorate Code: 3199

NOTIFICATION

ADMISSION TO FIRST YEAR B.TECH. PROGRAMS (A.Y. 2023-24)
AGAINST CAP [OPEN] & CAP [GCLM] VACANCY SEATS AND INSTITUTIONAL LEVEL SEATS (ILS)

Applications are invited from eligible candidates for admission to First Year B.Tech. programs against CAP [Open], CAP [GCLM] Vacancy Seats and Institutional Level Seats (ILS). Online applications can be made from the 07th of August 2023 (09.00 a.m.) till 16th of August 2023 (11.59 p.m.) by using the link available on the college website.

Please Note:- Candidates, who have already applied against our earlier notification for First Year B.Tech program in Engineering at the **Institute Level category (ILS)** need not apply again. However, candidates, who may wish to be considered separately also under the GCLM (Minority) category will have to compulsorily make a fresh application in the GCLM category.

ADMISSION TO DIRECT SECOND YEAR B.TECH. PROGRAMS (A.Y. 2023-24)
AGAINST POSSIBLE (CAP [OPEN] & GCLM [MINORITY]) VACANCY SEATS

Applications are invited from eligible candidates for admission to Direct Second Year B.Tech. programs in this college against possible vacancies arising out of CAP [Open] and GCLM [Minority] categories.

Applications can be made online from the 07th of August 2023 (09.00 a.m.) till 09th of September 2023 (11.59 p.m.) by using the link available on the college website.

Note:- Candidates, who wish to be considered in both the categories, provided there is vacancy, will have to compulsorily make separate applications in GCLM & Open categories.

ADMISSION TO FIRST YEAR M.TECH. PROGRAMS (A.Y. 2023-24)
(INSTITUTIONAL LEVEL SEATS (ILS) & VACANCY SEATS AGAINST CAP [OPEN], CAP [GCLM])

Applications are invited from eligible candidates for admission to First Year M.Tech. programs for Institutional Level Seats and vacant seats against CAP [Open] and CAP [GCLM]. Application form is available on the college website and it can be downloaded, filled up and submitted directly in the college office any time between 10.00 a.m. to 04.00 p.m. (on working days) from the 07th of August 2023 till 24th of August 2023.

Note:- Candidates, who may wish to be considered also under the GCLM (Minority) category will have to compulsorily make a fresh application in that category along with the application for Open Category. Application processing fee is ₹ 1,000/-, which once paid is non-refundable.

Please note: An application processing fee of ₹ 1,500/- per application for First Year B.Tech. & Direct Second Year admissions will have to be paid at the time of making the online application. The processing fee, once paid is non-refundable.

Admissions will be made on the basis of inter-se merit of candidates, who have applied to the institute in the prescribed form within the due date and on the basis of rules published in the 'Information Brochure' by the Competent Authority, Maharashtra State for admission to Undergraduate Technical Courses for the Academic Year 2023-24. Only those candidates are eligible to apply for vacancy seats, who have already applied to CAP rounds (registered with Competent Authority, Maharashtra State) and having a merit number.

For further details of Vacant Seats and Schedule of Admissions, candidates are requested to keep track of the latest information on the college website on a daily basis.

Sd/-
PRINCIPAL